राज्य दैनिक संपादक : दिपक खरात

# बाळकडू

|| हिंदुत्वाचा मानबिंदू || आवाज महाराष्ट्राचा ||

|| वर्ष ११ वे || अंक ७३ || पुणे || मंगळवार ०४ ऑगस्ट २०२६ || पाने ४ || किंमत ३ रुप

## अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान संस्थेतर्फे जिल्हा परिषद शाळांचा कायापालट

**बाळकडू : सचिन भांगे**

**टिटवाळा :-** अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान संस्था मागील १६ वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात काम करीत आहे .शैक्षणिक क्षेत्रात काम करीत असताना महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळांच्या अडचणी समजून घेऊन त्यात सुधारणा करण्याचा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. संस्थेच्या या उपक्रमांतर्गत संस्था आतापर्यंत १५००० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली आहे. व विद्यार्थ्यांच्या आयुष्यात एक सकारात्मक बदल घडून आला आहे. काही भागातील जिल्हा परिषद शाळा मोडकळीस आली असताना विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊ नये यासाठी या शाळा सुसज्ज पद्धतीने दुरुस्त करणे. शैक्षणिक दृष्ट्या




रंगरंगोटी करणे.आधुनिक जगाची स्पर्धा करताना सर्व सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे. विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या आरोग्याची काळजी घेण्याकरता स्वच्छ असे टॉयलेट बाथरूम उपलब्ध करून देणे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवणे. यासाठी विशेष लक्ष संस्था देत असते. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळा निंबवली देखील अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान संस्थेने अतिशय सुसज्ज केली आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री.अमोल वंजारे यांच्या अध्यक्षतेखाली व विश्वस्त श्री. सुजित माटे यांच्या संकल्पनेतून व विश्वस्त श्री.संदीप मोहिते. विश्वस्त श्री.मधुकर नारकर,विश्वस्त आरती वंजारे ह्याचा पुढाकाराने शाळेचा कायापालट करण्यात आला . या शाळेचे लोकार्पण निवृत्त शिक्षिका श्रीमती निर्मला ताई माटे यांच्या शुभहस्ते व समाजसेवक श्री सुहास माटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी विद्यार्थी पालक ,ग्रामस्थ, पत्रकार,शिक्षण अधिकारी, समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती मोठ्या संख्येने हजर होते. या सर्वांचे संस्थेचे अध्यक्ष अमोल वंजारे यांनी आभार व्यक्त केले. व येणाऱ्या काळात सर्वांचे सहकार्याने आणखी काही जिल्हा परिषद शाळा अत्याधुनिक करण्याचा मानस व्यक्त केला.